महाराष्ट्र पोलीस
सदरक्षणाय खलनिग्रहणाय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**विशेष पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ**

**दिनांक ०२/०५/२०२३**

## कोळंबी फाटा येथील दुहेरी खुनाचा गुन्हा १६ तासात स्थानिक गुन्हे शाखे कडुन उघड तिन आरोपी अटक

दिनांक ०१/०५/२०२३ रोजी रात्रौ २३:०० वा च्या सुमारास पोलीस नियंत्रण कक्ष येथे माहिती मीळाली की, यवतमाळ ते कोळंबी फाटा दरम्यान दोन इसम हे मृत अवस्थेत पडलेले असुन त्यांचा कोणीतरी खुन केला आहे. अशा माहितीवरुन मा. पोलीस अधीक्षक सा. मा. अपर पोलीस अधीक्षक सा. मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सा. यवतमाळ, मा. परिविक्षाधिन पोलीस उपअधीक्षक मा. पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन यवतमाळ ग्रामीण, ठाणेदार वडगांव जंगल स्थानिक गुन्हे शाखा चे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली व अनोळखी मृतक याची सकाळी ०४:०० वा पावेतो ओळख पटविली असा सदर मृतकांचे नांव अनुक्रमे १) अविनाश हनुमंत कटरे वय ३२ वर्ष रा. ह.मु. चापडोह पुर्नवसन जि. यवतमाळ २) उज्वल नारायण छापेकर वय २८ वर्ष रा. भोसा जि. यवतमाळ असे असल्याचे समजल्याने मृतकचे नातेवाईकांशी संपर्क साधुन त्यांची ओळख पटल्याने फिर्यादी विकास रामचंद्र हौंसकर वय ३६ वर्ष रा. महसुल नगर, यवतमाळ यांचे फिर्यादीवरुन अज्ञात आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन यवतमाळ ग्रामीण येथे अपराध क्रमांक १९५/ २०२३ कलम ३०२ भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचे घटनास्थळीच मा. पोलीस अधीक्षक श्री. पवन बन्सोड यांनी तात्काळ पाच पथके गठीत करुन आरोपी निष्पन्न करणे करीता रवाना करण्यात आले. त्याच दरम्यान सकाळी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास स्थानिक स्तरावरुन माहिती मीळाली की, मृतक अविनाश कटरे हा पाटापांगरा गावात वडीलोपार्जीत असलेल्या घराच्या जागेच्या हिस्सेवाटणीत आलेली जागा खाली करुन देण्याचे कारणावरुन चुलत आजी नामे राधाबाई व तीचा मुलगा नामे विकास कटरे यांचे सोबत वाद असुन मृतक नामे अविनाश हनुमंत कटरे हा दिनांक ०१/०५/२०२३ रोजी पाटापांगरा ता घाटंजी येथे मित्रासह गेला होता व त्या ठिकाणी आजी राधाबाई हिला धक्काबुक्की करुन वाद घातला होता. अशी माहिती प्राप्त झाल्याने स्थागुशाचे पथक पाटापांगरा येथे रवाना होवुन माहिती घेतली असता दिनांक ०१/०५/२०२३ रोजी दोघेही मृतक हे पाटापांगरा गावात आले होते व त्यांनी जागा खाली करुन देण्याचे कारणावरुन वाद घातला व धक्का बुक्की केली व गावातुन यवतमाळ कडे निघुन गेले होते. त्याचदरम्यान विकास कटरे याचे बाबत माहिती घेतली असता विकास हा कामानिमीत्याने यवतमाळ व गळवा या गावी गेल्याचे समजल्याने व संशयाची सुई हि विकास कडे जात असल्याने त्यास गळवा ता. बाभुळगांव या गावातुन ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने सदरचा गुन्हा हा हिस्सेवाटणी मध्ये आलेली जागा खाली करुन मागत असल्याचे कारणावरुन स्वतः व त्याचे दोन मित्रांचे मदतीने केल्याची कबुली दिल्याने गुन्हयात आरोपी नामे **१) विकास लालचंद कटरे वय २३ वर्षे रा. पाटापांगरा ता. घाटंजी २) भारत दिगांबर गाडेकर वय २२ वर्षे रा. मोहम्मदपुर ता. बाभुळगांव ३) गजानन रामराव मोरे वय २५ वर्षे रा. मोहम्मदपुर ता. बाभुळगांव यांना ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचे अटकेची कारवाई सुरु आहे.**

सदरचा गुन्हा हा अत्यंत क्लिष्ट, गुंतागुंतीचा आव्हानात्मक गुन्हा १६ तासाचे आत उघडकीस आणला असुन सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक यवतमाळ डॉ. श्री. पवन बन्सोड, अपर पोलीस अधीक्षक श्री. पियुष जगताप, यांचे मार्गदर्शनात श्री. प्रदिप पाटिल उपविभागीय पोलीस अधिकारी, पांढरकवडा प्रभार यवतमाळ उपविभाग, परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक श्री. विनायक कोते, दिनेश बैसाने, श्री. प्रदीप परदेशी पो.नि. स्थागुशा, श्रीमती दिपमाला भेंडे पो.नि. लोहारा प्रभार ठाणेदार पो.स्टे. यवतमाळ ग्रामीण, श्री संजु खंडारे ठाणेदार वडगांव जंगल, सपोनि विवेक देशमुख, पोउपनि राहुल गुहे, पोहवा साजीद सैयद, बंडु डांगे, अजय डोळे, रुपेश पाली, नापोशी विनोद राठोड, निलेश राठोड, रितुराज मेडवे, पोशी धनंजय श्रीरामे, चालक अमीत कुमरे, जितेंद्र चौधरी सर्व स्थागुशा तसेच सायबर सेल यांचे पथकाने यशस्वीरित्या पार पाडली आहे.

2.5.23

**( प्रदिप परदेशी )**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ**